आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

## ठळक बातम्या

- पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ, मालवण राजकोटमधला शिवरायांचा पुतळा पडल्याबद्दल प्रधानमंत्र्याकडून दिलगिरी व्यक्त

- शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानानं मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींवर तूर्त बंदी नाही, मात्र सरकारनं वेळीच धोरणात्मक निर्णय घ्यावेत, मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिकमध्ये नेमबाज अवनी लेखराच्या सुवर्ण पदकासह भारताची चार पदकांची कमाई

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वाढवण इथं ७६ हजार कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या बंदराचं भूमीपूजन, तसंच २१८ मत्स्यपालन विकास योजनेसह विविध विकास योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. हे आशियातल सर्वात मोठं आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरांमधलं एक बंदर असेल. वाढवण बंदरामुळे १२ लाख रोजगार निर्माण होतील, मच्छीमार आणि स्थानिकांच्या जीवनमानात अनेक सुधारणा होतील, असं त्यांनी सांगितलं....

**होल्ड- बाईट - मोदी (Modi Vadhvan 12LAKH ROJGAR)**

देशातल्या सर्व बंदरांमधून होणाऱ्या एकूण कंटेनर वाहतुकीपेक्षा अधिक कंटेनर वाहतूक या बंदरातून होईल. इथं येणाऱ्या हजारो जहाजं आणि कंटेनर मुळे परिसराचा चेहरा मोहरा बदलून जाईल. महाराष्ट्राकडे विकासासाठी लागणारं सामर्थ्य आणि संसाधनं आहेत. महाराष्ट्राला समुद्री व्यापाराचा इतिहास आहे आणि भविष्यातही व्यापाराच्या संधी आहेत, असं ते म्हणाले. महाराष्ट्राचा, या परिसराचा विकास होऊ नये असं वाटत असल्यानं विरोधक या बंदराला विरोध करत असल्याची टीका मोदी यांनी केली.

मालवणमध्ये राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याबद्दल मोदी यांनी दिलगिरी व्यक्त केली. शिवाजी महाराज हे आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. त्यांची, तसंच या घटनेमुळे ज्यांच्या भावना दुखावल्या त्यांचीही मी क्षमा मागतो, असं प्रधानमंत्री म्हणाले.

स्थानिक मच्छीमारांना transponders चं वाटप त्यांनी केलं. हे transponder बोटीवर लावायचे असून याद्वारे संपर्क व्यवस्था प्रस्थापित करणं सहज शक्य होणार आहे. इस्रोनं विकसित केलेलं हे transponder देशातल्या १ लाख बोटीवर लावले जाणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांनी काही मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्डचंही वाटप केलं.

हे वाढवण बंदर राज्यासाठी प्रगतीचं नवं शिखर ठरेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. या बंदराची निर्मिती करताना सर्वांचं हित ध्यानात ठेवू, कुणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, याची ग्वाही त्यांनी दिली. वाढवण बंदरामुळे आत्मनिर्भर आणि विकसित भारतात महाराष्ट्राची भूमिका

आणखी मजबूत होईल, असं केंद्रीय बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

वाढवण बंदरामुळे आर्थिक क्षेत्रात मुंबईचं आघाडीचं स्थान कायम राहील, यामुळे मच्छीमारांच्या आयुष्यात सकारात्मक बदल होतील, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. तर बंदरामुळे कुणाचंही नुकसान होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

गेल्या १० वर्षात देशातलं मत्स्योत्पादन दुप्पट झालं आहे. १०० हून अधिक देशात भारतातले मासे आणि संबंधित उत्पादनांची निर्यात होते, असं केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह म्हणाले.

<><><><><>

शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वित्त आणि तंत्रज्ञान विषयक ग्लोबल फिनटेक फेस्टला संबोधित करत होते. गेल्या १० वर्षांत ३१ अब्ज डॉलरची गुंतवणूक फिनटेकमध्ये झाली असून फिनटेक स्टार्टअप्समध्ये ५०० टक्के वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. बँक व्यवहारांचं संगणकीकरण झालं, गेल्या १० वर्षात ५३ कोटी जनधन खाती उघडली गेली त्यात २९ कोटींपेक्षा जास्त खाती महिलांची आहेत, असं सांगून ते म्हणाले की, फिनटेकमुळे महिला सक्षमीकरणालाही हातभार लागला आहे. थेट लाभ हस्तांतरण होत असल्यानं भ्रष्टाचाराला जागा राहिली नाही, असं मोदी यांनी सांगितलं.

भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आणि इन्फोसिसचे

सहसंस्थापक क्रिश गोपालकृष्णन यांचीही भाषणं यावेळी झाली.

<><><><><>

सिंधुदुर्गात मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्या प्रकरणी पोलिसांनी आज चेतन पाटील याला अटक केली. त्याला कोल्हापुरातून ताब्यात घेतल्याचं सिंधुदुर्ग पोलिसांनी सांगितलं. हा पुतळा बनवण्याचं कंत्राट मिळालेल्या मेसर्स आर्टिस्ट या कंपनीचा सल्लागार म्हणून चेतन पाटील काम पाहात होता. या कंपनीचा मालक आणि पडलेल्या मूर्तीचा शिल्पकार जयदीप आपटे, हा या प्रकरणातला आरोपी अद्याप फरार आहे.

<><><><><>

दहा हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांच्या नवीन ग्रंथालय मान्यतेचा फेर प्रस्ताव शासनाकडे तातडीनं सादर करावा, अशा सूचना उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

जिल्हा ग्रंथालय आणि अन्य ग्रंथालयांच्या विविध मागण्यांसंदर्भात पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम सुधारणेसंदर्भातला प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, तसंच ग्रंथालय अ. ब. क. ड वर्गाचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रंथालयांना ऑनलाइन वर्ग बदल करण्याच्या अनुषंगाने प्रणाली विकसित करावी, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

यंदाच्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरची बंदी तूर्त टळली आहे. पीओपीच्या गणेशमूर्तींवर बंदी आणण्याची मागणी करणारी

याचिका मूर्तिकार आणि पर्यावरणवाद्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर आज मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

गणेशोत्सव अवघा काही दिवसांवर आल्यामुळे यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालता येणार नाही. मात्र, राज्य सरकारनं केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्वांचं पालन करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं दिले. त्यासोबत प्रशासनानं पीओपी बंदीचं पालन करण्यासाठी कोणती पावलं उचलली आहेत, त्या संदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करावं, असे आदेश राज्य सरकारसह सर्व महानगरपालिकांना न्यायालयानं दिले आहेत.

<><><><><>

पॅरीस पॅरालिम्पिक स्पर्धेत आज भारतानं एक सुवर्ण आणि दोन कांस्यपदकं अशी चार पदकं मिळवली. भारताला रौप्यपदकही मिळालं. नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफल स्टॅन्डिंग प्रकारात आज भारताच्या अवनी लेखरानं नवा विक्रम नोंदवत सुवर्णपदकाची कमाई केली. तिनं २४९ पूर्णांक ७ दशांश गुण मिळवत ही ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. याच प्रकारात भारताच्या मोना अगरवालनं २२८ पूर्णांक ७ दशांश गुणांची कमाई करत कांस्यपदक पटकावलं. पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तल एस एच वन प्रकारात मनीष नारवालने रौप्यपदक जिंकलं.

महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या प्रीति पालनं कांस्यपदक मिळवलं. १४ . २१ सेकंदांची वेळ नोंदवत तिनं वैयक्तिक सर्वाेत्तम कामगिरी केली.  बॅडमिंटनमधे भारताच्या नितेश कुमारनं पुरुष

एकेरीच्या एसएस ३ प्रकारात चीनच्या यांग जिआनहुआनला २१-५, २१-११ असं सरळ गेममधे नमवत उपांत्य फेरीत धडक मारली.

<><><><><>

मोसमी पावसाचा मुक्काम यंदा लांबण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. साधारणपणे सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून परतीचा मान्सून सुरु होतो. परंतु यंदा‘ला निना’च्या प्रभावामुळे तयार होणाऱ्या कमी दाबामुळे सप्टेंबरअखेर किंवा ऑक्टोबरपर्यंत मान्सून लांबण्याची शक्यता आहे. मान्सूनचा मुक्काम वाढला तर खरीप पिकांना त्याचा फायदा होणार असून, खरीप लागवडीचं क्षेत्रही त्यामुळे वाढणार आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात, कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//